कार्यालयनागपूरमहानगरपालिका,नागपूर
(उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग)
छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, 6 या माळा,
महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-400001
Email-gardendept.nmc@gmail.com

क्रमांक:-NMC/OWL/GRDN/2025-26/...33914 दिनांक :-२४ /11/2025

प्रति,

डॉ. आशिष होले,
प्लॉट नं. ९३, श्यामनगर,
नागपूर.

विषय :- प्लॉट नं. 24, मौजा - अजनी, नागपूर येथिल प्रस्तावित नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या उंबर प्रजातीच्या एकूण 01 झाडाबाबत.

संदर्भ :- कार्यालयास प्राप्त आपले दिनांक 25.11.2025 चे पत्र.

वरील अर्जान्वये मोक्यावर जाऊन झाडाची/ झाडांची पाहणी करून झाडाच्या/झाडांच्या स्थितीचे निरीक्षण केले असता —

1. **मा. प्रशासक तथा अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण समिती, म.न.पा. नागपूर यांच्या दिनांक 30.10.2025 च्या मंजुरी अन्वये** आपणास खालील झाडे कापणी / छाटणी करण्यास खालील अटीवर परवानगी देण्यात येते.

**नं. 24, मौजा — अजनी, नागपूर येथिल प्रस्तावित नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या उंबर प्रजातीच्या प्रजातीच्या एकूण 01 पुरातन (हेरिटेज) झाडास जमिनीपासून कापणी करण्याची आपणास परवानगी देण्यात येते.**

2. आपणास परवानगी पत्रात उल्लेखलेल्या झाडाव्यतिरिक्त इतर प्रजातीची झाडे/झाडांच्या फांद्या छाटणी / कापणी करण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

3. आपणास झाड/झाडे/झाडांच्या फांद्या स्वखर्चाने व स्वत:च्या जबाबदारीवर छाटणी / कापणी कराव्या लागतील. झाड / झाडे / झाडांच्या फांद्या छाटणी / कापणी करतांना रहदारीला अडथळा होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.

4. **तोडण्यात/ प्रत्यारोपण करण्यात येणाऱ्या 01 झाडाऐवजी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, जुलै 16, 2021 / आषाढ 25 शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट—कलम (4) (ब) अन्वये तोडण्यात येणाऱ्या त्याचजातीची किंवा इतर कोणत्याही मूळ जातीची तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजित केलेल्या वयाइतक्या झाडाच्यासंख्येइतकी किमान सहा फुट इतक्या उंचीची 54 नग नविन झाडांची लागवड करावी. पोट-कलम (5 अ) अन्वये लागवड करण्यात येणारी झाडे आपणास कमीत कमी सात वर्षाच्या कालावधी करिता जगवावी लागेल. या कालावधीत झाडे न जगल्यास तितक्याच संख्येतील झाडांची लागवड करून त्याची हनीपुर्ती (भरपाई) करण्यात यावी. तसेचलागवड करण्यात आलेल्या झाडाचा फोटोसह अहवाल दर सहा महिन्यात कार्यालयास सादर करावा.**

5. सदर परवानगी पत्रानुसार व नमूद केलेल्या अटीनुसार झाड/झाडे/झाडांच्या फांद्या छाटणी/कापणी कराव्या लागतील अन्यथा महाराष्ट्र(शहरी क्षेत्र)वृक्षजतन (सुधारित) अधिनियम 1975 अन्वये आपल्यावर कार्यवाही करण्यात येईल.

6. **वृक्ष तोडण्याची परवानगी दिल्यापासून 15 दिवसानंतरच वृक्ष तोडण्यात यावे.**

7. वृक्ष प्रत्यारोपण (Transplant) करण्याकरिता तांत्रिक सल्ला आवश्यक असल्यास उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, म.न.पा. नागपूर ला संपर्क साधावा.

8. परवानगी देऊनही झाड किंवा झाडाच्या फांद्या न कापणी केल्यास झाड किंवा झाडाची फांदी पडून जीव व वित्तहानी झाल्यास सर्वस्वी जवाबदारी आपली राहील. कृपया याची नोंद घ्यावी.

9. **परवानगी व्यतीरीक्त इतर हेरीटेज व नॉन हेरिटेज वृक्ष असल्यास आपण हेरीटेज व नॉन हेरिटेज वृक्षाची कापणी करू नये. हेरीटेज व नॉन हेरिटेज वृक्षाची कापणी केल्यास महाराष्ट्र शासनराजपत्र असाधारण भाग आठ, जुलै 16, 2021 / आषाढ 25 शके 1943 अन्वये प्रकरण 8 मुख्य अधिनियमाच्या कलम 21 मधील पोट—कलम (1) मध्ये एक हजार रुपयापेक्षा कमी नसेल आणि पाच हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या या मजकुराऐवजी शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येईल, अश्या पद्धतीचा वापर करून काढलेल्या झाडाच्या मुल्याइतके परंतु 1,00,000/- रुपयापेक्षा कमी नसेल इतक्या रकमेचा मजकूर दाखल करणायत येईल. कृपया याची नोंद घ्यावी.**

9. **कापणी/ प्रत्यारोपण करण्यात येणाऱ्या 01 नग झाडाच्या मोबदल्यात पर्यायी नविन सावलीची 54 नग वृक्ष लागवड करून छायाचित्रासह नियोजन आराखडा 30 दिवसांच्या आत या कार्यालयात सादर करावे. अन्यथा डिपॉझीट रक्कम परत केल्या जाणार नाही.**

वृक्ष संरक्षक
नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रतिलिपी :-** वनपरिक्षेत्र सेमिनरी हिल्स, नागपूर यांना माहितीकरिता सादर.

Received
25/11/25

Scanned with OKEN Scanner